## उर्वरित उलटतपास वादींतर्फे वकील श्री.एस.आर.ओगले यांचे मार्फत शपथेवर सुरु–

२८. हे म्हणणे खरे आहे की सुलोचना भाटकर यांनी लिहिलेले मृत्यूपत्र मी वाचलेले आहे. त्या मृत्यूपत्राबाबत माझी कोणतीही हरकत नाही. हिराबाई नार्वेकर व गुणवंती तांडेल यांची मृत्यूपत्रे मी वाचलेली नाहीत. साक्षीदार पुन्हा सांगतो की मी हिराबाई नार्वेकर व गुणवंती तांडेल यांची मृत्यूपत्रे वाचलेली आहेत. या मृत्यूपत्रांबाबत माझी कोणतीही हरकत नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडिलांनी सुलोचना भाटकर यांना पैसे दिले याबाबत माझ्याकडे निशाणी १४५ व १४६ येथील कराराव्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी माझ्या वडिलांकडे सुलोचना भाटकर यांना देण्यासाठी रक्कम रुपये १०,०००/– होते हे दाखविण्यासाठी कोणताही पुरावा नाही. सखाराम भाटकर यांनी त्यांच्या हयातीत भाटकर कुटुंबातील कोणतीही जमीन विकली किंवा कसे हे मला माहीत नाही.

२९. राधाकृष्ण बापू तांडेल हे माझ्या माहितीतील असून ते आता हयात नाहीत. उत्तम देवू नवार हे माझ्या माहितीतील असून ते आता हयात आहेत. घनःश्याम शांताराम अणसुरकर हे माझ्या माहितीतील असून ते हयात आहेत. सुलोचना भाटकर यांच्याशी माझी वैयक्तीक भेट कधीही झाली नाही. मी माझ्या वडिलांच्या बऱ्याचशा सह्या पाहिलेल्या आहेत. मी माझ्या वडिलांना प्रत्यक्ष सही करताना पाहिलेले आहे. त्यांची सही कायम एकाच प्रकारची होती. (साक्षीदाराला निशाणी १४६ येथील करार दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे आहे की सदर कराराच्या दोन्ही पानांवर बॉण्ड खरेदी करणार म्हणून माझ्या वडिलांची सही नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर करारावर बॉण्ड पेपर कोणी विकले यांचे नाव व सही नाही. (साक्षीदाराला निशाणी १४५ येथील करार दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे नाही की सदर कराराच्या पहिल्या पानावरती म.लाडू अणसूरकर व दुसऱ्या पानावर म.ला.अणसूरकर असा मजकूर लिहिलेला असून त्या सह्या नाहीत. (साक्षीदाराला निशाणी १४६ येथील करार दाखविण्यात आला.) हे म्हणणे खरे नाही की सदर कराराच्या तिसऱ्या पानावरती मंगेश लाडू अणसूरकर असा मजकूर लिहिलेला असून ती सही नाही. हे म्हणणे खरे आहे की निशाणी १४५ व १४६ येथील करारामधील पानांवर जेथे जेथे खाडाखोड आहे व दोन ओळींच्यामध्ये दुसरा मजकूर लिहिलेला आहे तेथे सुलोचना भाटकर यांची स्वाक्षरी नाही.

३०. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकती या पुर्वीपासून दादू तांडेल यांच्याकडे

कुळपणासाठी होत्या. हे म्हणणे खरे आहे की त्यांना रघुनाथ व अर्जुन अशी दोन मुले असून दादू तांडेल यांच्या मृत्यूनंतर दावा मिळकती या त्यांच्या मुलांना प्राप्त झाल्या. हे म्हणणे खरे आहे की रघुनाथची पत्नी आनंदी व अर्जुनची पत्नी गुणवंती आहे. हे म्हणणे खरे आहे की रघुनाथ यांना हिराबाई उर्फ सुंदराबाई गणपत नार्वेकर व राधाबाई कृष्णा पांढरे अशा दोन मुली आहेत. हे म्हणणे खरे आहे की हिराबाई यांना मुलबाळ नाही. हे म्हणणे खरे आहे की राधाबाई यांच्या मुलाचे नाव वसंत असून तेच मुळ वादी आहेत. हे म्हणणे खरे आहे की अर्जुनला सुलोचना सखाराम भाटकर व चंपू उर्फ लक्ष्मी गोविंद मांजरेकर अशा दोन मुली असून त्या दोघींनाही मुलबाळ नाही. हे म्हणणे खरे नाही की रघुनाथ व अर्जुन यांचे वारस मयत झाल्यानंतर दावा मिळकती या वसंत पांढरे यांना मिळाल्या. हिराबाई उर्फ सुंदराबाई गणपत नार्वेकर यांनी त्यांचे मृत्यूपत्र करुन त्यांच्या नावे असलेली सर्व मिळकत ही वसंत पांढरे यांच्या नावे केली होती किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की गुणवंत अर्जुन तांडेल हिने स्वतःचे मृत्यूपत्र करुन तिच्या मालकीची सर्व मिळकत ही सुलोचना भाटकर हिला दिली होती. हे म्हणणे खरे आहे की गुणवंतीचा नवरा अर्जुन हा कुटुंबामध्ये मोठा असल्याने दावा मिळकतीच्या सातबारा सदरी कुळ म्हणून गुणवंती हिचे नाव नोंदविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की गुणवंतीच्या मृत्यूनंतर दावा मिळकतीच्या सातबारा सदरी कुळ म्हणून सुलोचना भाटकर हिचे नाव नोंदविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की सुलोचना भाटकर यांनी एकत्र कुटुंबासाठी जमीन कुळ कायद्यानुसार दावा मिळकती खरेदी केल्या. प्रतिवादी क्र. १ शंकर भाटकर हा सुलोचना भाटकर यांचा पुतण्या आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र. १ हे मोलमजूरी करायचे. हे म्हणणे खरे आहे की माझे वडील मंगेश लाडू अणसूरकर हे मोलमजूरी करायचे. हे म्हणणे खरे आहे की माझे वडील मंगेश लाडू अणसूरकर हे सुलोचना भाटकर यांच्या सांगण्यावरुन दावा मिळकतीमध्ये मोलमजूरी करायचे. हे म्हणणे खरे नाही की शंकर भाटकर व माझे वडील यांचा दावा मिळकतीमध्ये कोणताही संबंध नाही. वसंत पांढरे यांनी माझ्या वडिलांच्या विरुध्द पोलीस स्टेशनला काही तक्रार केल्या होत्या किंवा कसे हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की एप्रिल २०१३ मध्ये वसंत पांढरे हे दावा मिळकत क्र. २ मध्ये साफसफाईचे काम करीत असताना माझे वडील व शंकर भाटकर हे तेथे आले व त्यांनी वादींना अर्वाच्य शब्दामध्ये शिवीगाळ करुन दावा जमिनी कब्जातून काढून घेण्याची व मारहाण करण्याची धमकी दिली हे मी खोटे सांगत आहे.

**३१.** हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकती या सुलोचना भाटकर यांच्या वाटपाच्या व वैयक्तीक आहेत हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की निशाणी १४५ व १४६ येथील करार सुलोचना भाटकर यांनी माझ्या वडिलांना करुन दिला, मोबदला स्वीकारला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की सुलोचना भाटकर यांनी दावा मिळकतीचा कब्जा, मालकीहक्क हस्तांतरीत केला, दावा मिळकतींचा कब्जा व मालकी माझ्याकडे आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की निशाणी १४५ व १४६ येथील करारांची अंमलबजावणी करुन देण्याची विनंती मी किंवा माझ्या वडिलांनी शंकर भाटकर यांना नोटीसीद्वारे केलेली नाही. मी किंवा माझ्या वडिलांनी तशी विनंती अथवा मागणी शंकर भाटकर यांना केली हे दाखविण्यासाठी माझ्याकडे कराराव्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा नाही. मी किंवा माझ्या वडिलांनी शंकर भाटकर यांना जी काही मागणी केली त्याचे शंकर भाटकर यांनी काय उत्तर दिले याबाबत माझ्याकडे कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की माझी कैफियत, प्रतिदावा व सरतपासाच्या प्रतिज्ञापत्र यामध्ये मी किंवा माझ्या वडिलांनी शंकर भाटकर यांना नोटीशीद्वारे मागणी केली व त्याचे काय उत्तर आले याबाबतचा मजकूर नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की मी किंवा माझ्या वडिलांनी तशी कोणताही मागणी शंकर भाटकर यांना केली नाही म्हणून तसा मजकूर मी माझ्या कैफियत, प्रतिदावा व सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये लिहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की वसंत पांढरे यांना मी किंवा माझ्या वडिलांनी करारांची अंमलबजावणी करुन द्या म्हणून आजपर्यंत कोणतीही नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकती या लुबाडून घेण्यासाठी निशाणी १४५ व १४६ येथील आम्ही खोटे कागद तयार केले व त्याद्वारे खोटा हक्क उभारला. हे म्हणणे खरे नाही की माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

**सही/-**
(के.के.पाटील)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.

दिनांक- १०/०१/२०२४.